

# श्री संत तुकाराम अभंगवाणी-हेचि दान देगा देवा

https://www.chalisa.online

हेंचि दान देगा देवा ।
तुझा विसर न व्हावा ॥१॥

गुण गाईन आवडी ।
हेचि माझी सर्व जोडी ॥२॥

न लगे मुक्ति आणि संपदा ।
संतसंग देई सदा ॥३॥

तुका ह्मणे गर्भवासी ।
सुखें घालावें आह्मांसी ॥४॥

|| https://www.chalisa.online ||